पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- ०३/०५/२०२१

| पो.स्टे /अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटना ता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचे नाव |
|---|---|---|
| आरमोरी - अप.क्र. १३२/२०२१ कलम - ६५(अ), ९८(क), महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम | मौजा वैरागड ते मेंढेबोडी रोड १० किमी पुर्व **घटना ता. वेळ** :- दि.०३/०५/२०२१ चे ०५:१५ ते ०६:३० वा.पर्यंत | फिर्यादी सरकार तर्फे पोहवा/१८५० निलकंठ पेंन्दाम नेम. स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली **पाहिजे आरोपी** - **चारचाकी वाहन क्र. एम.एच.१२- केएन- ९५४४ चा अज्ञात चालक** |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवेधदारु मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती वरुन | **स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली** – निलकंठ पेन्दाम, शुक्राचारी गवई, सुनिल पुड्डावार, मंगेश राऊत, शेषराज नैताम | |

गडचिरोली जिल्हयातील अवैध दारुविक्री तसेच बेकायदेशीर दारु वाहतुकीस आळा बसावा याकरीता मा.श्री अंकित गोयल, पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी जिल्हयातील अवैध दारु – जुगार व ईतर अवैध व्यवसायांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशीर कार्यवाही करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक ०३/०५/२०२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे मा. पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी सा. गडचिरोली यांचे आदेशाने पोलीस पथक दारु रेड कामी मौजा गडचिरोली, आरमोरी ,देसाईगंज परिसरात गस्त करीत असतांना अवैध दारु विक्रेते हे गोंदिया जिल्हयातुन वैरागड मार्गे अवैध देशी दारुचा पुरवठा गडचिरोली, आरमोरी येथे एम.एच - १२ के.एन. ९५४४ या चारचाकी वाहनाने करणार आहेत अशा खबरेकरुन मा. समिर शेख अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) यांना माहीती देवुन त्यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडील वरील नमुद पोलीस पथक हे अवैध दारु रेड कारवाई करीता दोन स्थानिक पंचांना सोबत घेवुन मिळालेल्या माहीतीचे आधारे मौजा वैरागड ते मेंढेबोडी रोडचे बाजुला आपआपले अस्तीत्व लपवुन व तात्पुरता अडथळा निर्माण करुन सापळा रचुन बसलो असता एक पांढरे मारुती सुझुकी कंपनीची रिटझ चारचाकी वाहन संशयास्पदरीत्या येतांना दिसले त्या चारचाकी वाहनाचे चालकास वाहन हात दाखवुन थांबविण्याचा इशारा केला असता नमुद चारचाकी वाहनाच्या चालकाने आम्ही पोलीस असल्याचा संशय आल्याने वाहन आमचे पासुन अंदाजे ५० ते १०० मीटर अंतरावर उभे ठेऊन अंधाराचा फायदा घेउन पळ काढला. पोस्टाफ व पंचांनी त्याचा पाठलाग करुन पकडण्याचा प्रयत्न केला असता तो मिळुन आला नाही. त्यानंतर परत नमुद चारचाकी वाहन मारुती सुझुकी रिटझ रजिस्ट्रेशन क्रमांक एम एच १२ केएन – ९५४४ चे जवळ जाऊन सदर वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये खालील वर्णनाचा व किंमतीचा अवैध देशी दारुचा मुद्देमाल मिळुन आला तो खालीलप्रमाणे. १) किंमत २,८०,०००/- रुपये - देशी दारु सुपर सॉनिक रॉकेट संत्रा कंपनीच्या ९० मिली मापाच्या एकुण ३५ पेटया. प्रति पेटी १००

सीलबंद नीपा प्रमाणे एकुण ३५०० सीलबंद नीपा अवैध विक्री किंमत ८०/- रुपये प्रति नीप प्रमाणे. २) किंमत ३,५०,०००/- अवैध दारु वाहतुकीकरीता वापरलेली एक पांढ-या रंगाची मारुती सुझुकी कंपनीची रिटझ चारचाकी वाहन .रजिस्ट्रेशन क्रमांक एम.एच.१२ केएन-९५४४ असलेला असा आहे. असा **एकुण ६,३०,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल** घटनास्थळावरुन जप्ती करुन ताब्यात घेवुन गुन्हयातील अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन आरमोरी येथे वरील नमुद कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सध्या संपुर्ण देशात कोवीड-१९ या साथीच्या रोगाची आपत्ती जनक परीस्थीती निर्माण झालेली असुन महाराष्ट्र राज्यात लॉकडाऊन असल्याने सदरचे कालावधीत अवैध दारुविक्री व बेकायदेशीर दारु वाहतुक होणार नाही. याकरीता स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक अहोरात्रो अवैध दारु रेड मोहीम राबवुन प्रभावीपणे कारवाई करीत आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाच्या प्रभावी कारवाई मुळे अवैध दारुविक्री करणारे तसेच बेकायदेशीररित्या दारुची वाहतुक करणाया लोकांचे धाबे दणाणले आहे.

